# पुणे महानगरपालिका

## <u>पुणे स्मार्ट सिटी मिशनसाठीच्या विशेष उद्देश वाहना (एसपीव्ही) ची रचना व तत्वे</u>

शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार (केंद्र सरकार) यांनी पुढील ५ वर्षांमध्ये १०० शहरांचा स्मार्ट सिटीज म्हणून विकास करण्याच्या उद्देशाने स्मार्ट सिटीज अभियानाचा (**अभियान** ) प्रारंभ केला आहे. मूलभूत पायाभूत सुविधा पुरविणा-या आणि लोकांच्या जीवनाची गुणवत्ता सुधारणा-या आणि शहरांना अधिक राहण्यायोग्य, सर्वसमावेशक आणि आर्थिक प्रगतीचे केंद्र बनविणा-या शहरी विकास उपक्रमांना पुन्हा परिभाषित करण्यावर लक्ष केंद्रीत करणा-या शहरांना प्रोत्साहन देणे हे या अभियानाचे उद्दीष्ट आहे. केंद्र सरकार द्वारे जून २०१५ मध्ये जारी करण्यात आलेल्या स्मार्ट सिटी अभियान विधान आणि मार्गदर्शक तत्वांनुसार (मार्गदर्शक तत्वे) या अभियानाची अंमलबजावणी केली पाहिजे.

पुणे शहरामधील अभियानाच्या अंमलबजावणीसाठीच्या विशेष उद्देश वाहनाच्या (एसपीव्ही) निर्मितीसाठीच्या रचनेचे आणि तत्वांचे विवरण हा दस्तावेज करतो. एक चांगले-कार्य करणा-या एसपीव्ही ची निर्मिती करणे आणि रचनेची व तत्वांची अंमलबजावणी करणे हे या अभियान मधील यशासाठीचा एक महत्वाचा घटक आहे. पुणे महानगरपालिकेचे (पुणे मनपा) सशक्तीकरण करण्यासाठी, कामकाजाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी आणि त्याच्या कामकाजामध्ये नाविन्यता आणण्यासाठी या विशेष उद्देश वाहना (**एसपीव्ही**) ची स्थापना करण्यात येत आहे.

या दस्तावेजाची विभागणी खालील विभागांमध्ये करण्यात आली आहे:

१. **एसपीव्ही ची रचना**
२. **एसपीव्ही चे भागधारक (शेअरहोल्डर) आणि खाजगी सहभाग**
३. **या एसपीव्ही चे प्रमुख उद्देश (कार्य आणि जबाबदा-या)**
४. **निधीचे वितरण /वित्त पुरवठा**
५. **एसपीव्ही चे व्यवस्थापन /कार्यान्वायण**
६. **अधिकारांचे पुनर्प्रदान शिष्टमंडळ**
७. **अनेक विविध**

### १. एसपीव्ही ची रचना :-

या अभियानाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार शहर पातळीवरील या अभियानाची अंमलबजावणी या उद्देशासाठी तयार करण्यात आलेल्या एका विशेष उद्देश वाहनाद्वारे केली जाईल.

पुणे शहरासाठीची विशेष उद्देश वाहन ही एक पब्लिक लिमिटेड कंपनी असेल जी कंपनी अधिनियम २०१३ (कंपनीचा अधिनियम), च्या संबंधित तरतुदी अंतर्गत तयार केली जाईल आणि महाराष्ट्र शासन (राज्य शासन) आणि पुणे महानगरपालिका (पुणे मनपा) यांच्या संयुक्त विद्यमाने याला प्रोत्साहन दिले जाईल.

एसपीव्ही चे अधिकृत भाग भांडवल (Authorized Capital ) रू. ५,००,००० इतके असेल. राज्य सरकार आणि पुणे मनपा यांचे या भाग भांडवलात समान हिस्सा असेल. एसपीव्ही चे कमीतकमी देय भाग

भांडवाल (पेड अप कॅपिटल) रू. ५,००,००० एवढे असेल. या एसपीव्ही च्या भाग भांडवाला मध्ये वाढ, कमी करणे आणि बदल करणे या गोष्टींना कंपनी अधिनियमामध्ये असलेल्या तरतूदी नुसार मुभा राहील.

**उप-एसपीव्ही**

या मार्गदर्शकतत्वां अंतर्गत, निर्णय घेण्यासाठी आणि अभियानाच्या अंमलबजावणीसाठी एसपीव्ही ला स्वायत्तता आणि कार्यान्वियण स्वातंत्र्य दिले गेले आहे. या अभियाना अंतर्गत प्रकल्पांची अंमलबजावणी संयुक्त उपक्रम , अर्थ सहाय्य करणाऱ्या कंपन्या , सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी), ठोक करार इ. यांच्या द्वारे केली जाऊ शकते का याचा निर्णय घेण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य एसपीव्ही च्या संचालक मंडळाला (बोर्ड) आहे, म्हणून संबंधित प्रकल्पांची (पॅन सिटी उपक्रम आणि स्थानिक क्षेत्र विकास) अंमलबजावणी करण्यासाठी मुख्य उद्देश वाहन व्यतिरिक्त, येथे प्रकल्प निहाय सब एस पी व्ही असू शकतील. या विविध सब एस पी व्ही मध्ये प्रकल्प निहाय विशेष उद्देश वाहन ज्यात प्रकल्पाशी संबधित पोर्टफोलिओ असलेल्या क्षेत्रीय भागभांडवल कंपन्या, अर्थ सहाय्य करणाऱ्या कंपन्या किंवा सार्वजनिक खाजगी भागीदारी यांचा समावेश असू शकेल.

**२. एस पी व्ही चे भाग भांडवल आणि खाजगी सहभाग**

विशेष उद्देश वाहनाच्या भाग भांडवलाचे रचनेच्या अनुषंगाने, ही मार्गदर्शकतत्वे निर्दिष्ट करतात की राज्य शासन आणि पुणे मनपा हे एसपीव्ही मधील संयुक्त प्रवर्तक (जॉईट प्रमोटर्स) असतील, ज्यामध्ये त्यांचा समान इक्विटी सहभाग असेल. जर राज्य शासन आणि पुणे मनपा यांचा शेअरहोल्डिंग (शेअरधारण करण्याची) प्रमाण ५०:५० इतका राखला गेला पाहिजे (सर्व वेळात शेअरहोल्डींग सारखेच असेल आणि राज्य शासन आणि पुणे मनपा यांचे एकत्रितपणे शेअरहोल्डिंग जास्त असेल आणि एसपीव्ही चे नियंत्रण असेल. तसेच एसपीव्ही मधील एक्विटी भागभांडवल घेण्यासाठी खाजगी क्षेत्राचा किंवा आर्थिक संस्थांचा विचार केला जाऊ शकतो. याचा उल्लेख करणे सांदर्भिक असेल की राज्य शासन, पुणे मनपा आणि खाजगी क्षेत्राचे शेअरहोल्डिंग ४०:४०:२० किंवा ३०:३०:४० किंवा २६:२६:४८ या प्रमाणात असु शकेल.

या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एस पी व्ही मध्ये खाजगी क्षेत्राचे सहभागासाठी परवानगी संदर्भात (राज्य शासन आणि पुणे मनपा च्या निर्णयानुसार), स्मार्ट सिटीज च्या प्रकल्पांना व्यवहार्य करण्यासाठी खाजगी क्षेत्राच्या /आर्थिक संस्थांच्या सहभागाची आवश्यकता आहे, कारण यासाठी मोठ्या प्रमाणातील संसाधने आणि मोठ्या प्रमाणातील गुंतवणुकीची आवश्यकता आहे. हे महत्वाचे आहे की हे खाजगी संस्था एसपीव्ही च्या रचनेमध्ये योग्य प्रकारे अंतर्भूत झाले पाहिजे (नंतरच्या टप्प्यामध्ये सुद्धा), आणि राज्य शासन आणि पुणे मनपा मधील अधिकाराचा समतोल साधला जात आहे याची खात्री दिली पाहिजे. आर्थिक संस्था भागधारक असल्याने एसपीव्ही ची विश्वासार्हता वाढेल, विशेषत: कर्जे घेण्याच्या वेळी आणि खाजगी संस्थाच्या सहभागामुळे परिणामकारकता साध्य करण्यास, सेवांची गुणवत्ता सुधारण्यास आणि नवीनीकरणास प्रोत्साहन देण्यास मदत होईल.

**पर्यायाने, खाजगी गुंतवणुक एसपीव्ही च्या वरील पातळीवर करण्याऐवजी उप-एसपीव्ही पातळीवर सुद्धा केली जाऊ शकते.(ही परिस्थिती जास्त शक्य आहे यामुळे खाजगी क्षेत्रांना त्यांच्या निवडीच्या क्षेत्रामध्ये गुंतवणुक करण्याची लवचिकता आहे अशी खात्री मिळेल, आणि विविध उप-एसपीव्ही साठी तेथे विविध खाजगी संस्था असू शकतील.**

३. **एसपीव्ही चे प्रमुख उद्देश (कार्य आणि जबाबदा-या)**

पुणे मनपाचे सशक्तीकरण करण्यासाठी, कामकाजाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी आणि त्याच्या कामकाजामध्ये नाविन्यता आणण्यासाठी विशेष उद्देश वाहनाची स्थापना करण्यात आली आहे. पुणे मनपाचे कोणतेही हक्क किंवा अधिकार दुर्बल होणार नाहीत. दर निश्चित करण्याचे पुणे मनपाचे अधिकार अबाधित राहतील एसपीव्ही, प्रकल्प अंमलबजावणी मधील काही स्वायत्ततेसह पुणे मनपा चा एक कार्यकारी अंग म्हणून कार्य करेल.

एसपीव्ही खालील कार्ये करेल:

(अ) या अभियान अंतर्गत असलेले एसपीव्ही क्षेत्रामधील स्थानिक क्षेत्र विकास प्रकल्पांना त्यांच्या तांत्रिक मूल्यमापनासह परवानगी आणि मंजूरी देणे. एसपीव्ही क्षेत्र म्हणजे औंध-बाणेर-बालेवाडी (एबीबी) क्षेत्र ज्याला या मिशन अंतर्गत मंजूरी मिळाली आणि भविष्यामध्ये पुणे मनपा ने मंजूरी दिल्यानुसार कोणतेही इतर क्षेत्र.

(ब) या अभियान अंतर्गत असलेल्या पुण्यासाठीच्या पॅन सिटी प्रकल्पांना त्यांच्या तांत्रिक मूल्यमापनासह परवानगी आणि मंजूरी देणे.

(क) स्थानिक क्षेत्र आधारित आणि पॅन सिटी प्रकल्पांसाठीच्या पीएमपीएमएल आणि शहर वाहतूक पोलीस यांसारख्या विविध संस्थामध्ये समन्वय साधणे

(ड) या अभियाना अंतर्गत प्रकल्पांसाठी प्रकल्प निर्मीतीचे सर्व कार्य करणे ज्याच्या त्या प्रकल्पांच्या अंमलबजावणी साठी प्रकल्प विशेष एस पी व्हि ची निर्मीती करणे यासह प्रकल्प विशेष एस पी व्हि चे विभाग वार धारक कंपनीचा समावेश असेल.

(इ) प्रकल्प निश्चिती आणि विकास करणे आणि जोखिम व्यवस्थापन, प्रकल्प रचना करणे, प्रकल्पाचे मूल्यमापन करणे, स्वारस्य प्रगटीकरण/प्रस्ताव मागणी (एक्स्चेंज ऑफ इंटरेस्ट/ आर एफ पी)इ. साठीची अभिव्यक्तता तयार करणे, निविदाचे मूल्यमापन करणे, निविदा प्रक्रिया व्यवस्थापन आणि प्रकल्प व्यवस्थापन यांसाठीच्या व्यावसायिक अदाने (इनपुटस) ची व्यवस्था करणे.

(ई) प्रस्तावांची योग्य ती काळजी घेणे आणि विश्लेषण करणे, तपासणी आणि मूल्यमापन करणे आणि प्रकल्पांचे निरीक्षण करणे.

(उ) स्थानिक-क्षेत्र विकास प्रकल्प आणि पॅन-सिटी प्रकल्प यां दोहोंसाठीची अंमलबजावणी झाल्यानंतर कार्यान्वयण आणि देखभाल व दुरुस्तीची कामे करणे.

(ऊ)परिणाम शुल्कामधून आणि पीआयएफ आधारित बाँडस जारी करून महसूल प्राप्ती करणे आणि तसेच एसपीव्ही क्षेत्रामध्ये जमीन कमाई (लॅन्ड मॉनिटायझेन) चे अधिकार

एसपीव्हीला राहतील. मनपा च्या वतीने स्थनिक विकासाच्या क्षेत्रातील व त्या क्षेत्रातील मालमत्ता कर गोळा करेल आणि बांधकाम परवानगी देईल. मात्र या प्रमाणे गोळा केलेला महसूल पुणे मनपा कडे जमा करेल.

(ए) एसपीव्ही क्षेत्रामध्ये जमिनीच्या एक गठ्ठा पद्धतीने शहर नियोजन योजना प्रस्ताव (टाऊन प्लनिंग स्कीम मार्फत विकास करण्याचे अधिकार राहतील.

(ऐ) एसपीव्ही क्षेत्रामधील झोपडपट्टी वस्तीच्या पुनर्वसन कामामध्ये एसपीव्ही विकसक म्हणून काम करेल

(ओ ) एसपीव्ही क्षेत्रामध्ये पुणे महानगरपालिकेशी संबंधित घन कचरा व्यवस्थापन, पाणी इतर पालिका सेवा यांसारख्या विभागांशी सेवा पातळी करार (एसएलए) करणे तसेच या क्षेत्रातील ही कामे कराराने देणे.

(औ ) पुणे मनपाच्या पूर्व परवानगीने अधिक क्षेत्रांचा समावेश करण्यासाठी कोणत्याही वेळी या एसपीव्ही क्षेत्राचा विस्तार केला जाऊ शकतो

(अं ) नागरिकांसाठी एसपीव्ही क्षेत्रातील सुविधेसाठीच्या मोकळया जागा (Amenity Space) आणि पुणे मनपाच्या नावे असलेल्या जमीनी विकसीत करणे. पुणे मनपा अशा जमीनी कोणत्याही शुल्काशिवाय एसपीव्ही ला हस्तांतरीत करेल.

(अः ) संबंधित अधिनियमांमधील तरतुदीनुसार एस पी व्हि च्या उद्देशासाठी ठेवी स्वीकारणे, बाँडस जारी करणे, बाह्य स्त्रोतांमधून कर्ज काढणे या गोष्टी ची मुभा राहील .

***एसपीव्ही ची प्रकल्प निहाय कामे आणि एसपीव्ही क्षेत्रामधील स्थानिक-क्षेत्र विकासासाठी इतर संस्थांबरोबर समन्वय***

एसपीव्ही क्षेत्रामधील एसपीव्ही च्या प्रत्येक विभागाची कामे करणे खालील प्रमाणे असेल:

**(अ) वाहतूक आणि गतिशीलता :**

१ *बस रपिड ट्रान्सपोर्ट (बीआरटी) आणि रस्ते पायाभूत सुविधा:* एसपीव्ही मधील रस्त्यांची, बीआरटी जाळे साठीचे बस थांबे यांची बांधणी करेल. पीएमपीएमएल बसेसची व्यवस्था करेल आणि चालवेल आणि आवश्यकता असल्यास मार्गांवर बसेस कराराबद्ध करण्याचा पर्याय एसपीव्ही कडे असेल. एसपीव्ही क्षेत्रामधील बस थांब्यांच्या कार्यान्वयण आणि देखभालीसाठी एसपीव्ही जबाबदार असेल.

२ *नॉन-मोटराईझ्ड वाहतुक (एनएमटी-मोटार-विरहीत वाहने) पायाभूत सुविधा*: एसपीव्ही पादचारी पथ, सायकलचे मार्ग यांची बांधणी करेल, रस्ते आणि चौरस्त्यांची पुर्नरचना करेल, जागेची निश्चिती करणे आणि कार्यान्वियण आणि देखभालीसाठी जबाबदार असेल.

३ *सार्वजनिक सायकल शेअरिंग (पीबीएस) पायाभूत सुविधा:* एसपीव्ही ही *सार्वजनिक सायकल शेअरिंग* प्रणालीची स्थापना करेल , ती चालविणे कार्यान्वियण आणि देखभाल करणे यासाठी यंत्रणा उभी करेल

४ *विद्युत बसेस:* एसपीव्ही बसेस उपलब्ध करेल, मार्ग आणि दर निश्चित करेल, ज्यांचे कार्यान्वियण आणि देखभाल एका खाजगी ऑपरेटर द्वारा केले जाईल.

५ *ई-रिक्षा:* ई-रिक्षा उपलब्ध करण्याची आणि खाजगी ऑपरेटर्सना भाड्याने देण्याची क्षमता एसपीव्ही कडे असेल.

**(आ) पाणी आणि मलनि:सारण :**

- *पाणी पुरवठा व्यवस्थापन* : मोठ्या प्रमाणातील पाणी (बल्क वाटर) एका आधीच-निश्चित केलेल्या दराने देण्यासाठी एसपीव्ही पुणे मनपा बरोबर एक सेवा पातळी करार (एसएलए) करेल; एसपीव्ही दररोज दरडोई १५० लि. पाणी पुरवठा करण्यासाठी मुख्य पायाभूत सुविधांची निर्मिती करेल. मुख्य कार्यान्वियण आणि देखभाल समस्यांची हाताळणी पुणे मनपा करेल, लहान प्रश्नांचे व्यवस्थापन एसपीव्ही करेल. एसपीव्ही क्षेत्रामधील पाणी व्यवस्थापनाचे कामकाज एसएलए नुसार पुणे मनपाच्या कर्मचा-यांकडून केले जाईल.
- सांडपाणी व्यवस्थापन : बाणेर सांडपाणी उपचार प्रकल्प (एसटीपी) ची क्षमता वाढविणे आणि व्यवस्थापन करणे हे काम पुणे मनपा कडून केले जाईल
- *नदी स्वच्छ करणे*: एसपीव्ही मूळ-वलय (रूट झोन) तंत्रज्ञानानुसार आवश्यकती व्यवस्था आणि नदीची भौतिक स्वच्छता करेल
- *पावसाचे पाणी जमा करणे* (रेन वाटर हार्वेस्टिंग) : एसपीव्ही क्षेत्रामधील गृह निर्माण सहकारी संस्था मध्ये एसपीव्ही सम्पस (डबके) उपलब्ध करेल , आणि कार्यान्वियण आणि देखभाल करण्याची जबाबदारी सोसायट्यांची राहील

**(इ) घन कचरा व्यवस्थापन आणि स्वच्छता :**

*१घन कचरा व्यवस्थापन*: एसपीव्ही बरोबरच्या एसएलए प्रमाणे पुणे मनपा दारोदारी जाऊन कचरा गोळा करण्यास जबाबदार राहील . वर्गीकरण करण्यात आलेल्या कच-याची वाहतूक करण्यास, एसपीव्ही जबाबदार राहील आणि एसपीव्ही च्या क्षेत्रामधील घन कच-याचे व्यवस्थापन कार्यक्षमतेने होण्यासाठी ट्रान्सफर (हस्तांतरण) स्टेशन्स चालवेल आणि एसपीव्ही क्षेत्रामधील निर्माण केलेल्या इतर संबंधित सुविधा कार्यान्वित करेल.

*१.स्वच्छता*: एसपीव्ही क्षेत्रामधील सार्वजनिक पायाभूत सुविधांची साफ सफाई आणि स्वच्छतेसाठी एसपीव्ही जबाबदार असेल. सार्वजनिक आणि शाळेची शौचालये एसपीव्ही कडून उपलब्ध करुन दिले जातील याचे कार्यान्वयण आणि देखभाल यासाठीचा योग्य करार करण्याची मुभा एसपीव्ही ला राहील .

(ई) **ऊर्जा आणि सौरऊर्जा** :

१. ***स्मार्ट ग्रिड* :** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी ही एसपीव्ही क्षेत्रामधील स्मार्ट ग्रिड टीआणिडी जाळया (नेटवर्क) ची स्थापना करेल. एसपीव्ही नेट मीटर्स खरेदी करेल आणि सेवा पातळी करार (एसएलए) मार्फत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला हस्तांतरीत करेल. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी ही नेटवर्क आणि मीटर्सच्या कार्यान्वयणासाठी आणि देखभालीसाठी जबाबदार राहील.

२. **सौरऊर्जा :** सोलर पॅनल्सची स्थापना करण्यासाठी आणि कार्यान्वयण आणि देखभालीसाठी खाजगी ऑपरेटर ग्राहकांबरोबर थेट पीपीए करेल. आवश्यकता असल्यास एसपीव्ही ही एसपीव्हीच्या क्षेत्रात सौरऊर्जेचा विकास करण्यासाठी आवश्यक उपाय योजना व प्रोत्साहन देईल.

३. ***पथ दिवे* :** एसपीव्ही क्षेत्रामधील पथ दिव्यांची खरेदी करणे, स्थापना करणे कार्यान्वयन आणि देखभालीसाठी एसपीव्ही जबाबदार राहील.

**(उ) सुविधा आणि नदीकाठाचा विकास:**

१. ***मोकळया जागा :*** एसपीव्ही क्षेत्रामधील बागा, बगीचा आणि मोकळया जागा विकसित करेल आणि कार्यान्वयण आणि देखभालीसाठी एसपीव्ही जबाबदार राहील.

२. ***खुल्या जिम्स, रस्त्यावरील फर्निचर आणि इतर सुविधा :*** एसपीव्ही क्षेत्रामधील खुल्या जिम्स, रस्त्यावरील फर्निचर आणि इतर सुविधा स्थापित करणे आणि कार्यान्वयण आणि देखभालीसाठी एसपीव्ही जबाबदार राहील.

३. ***नदीकाठाचा विकास :*** एसपीव्ही क्षेत्रामधील बांधकाम आणि देखभालीसाठी एसपीव्ही जबाबदार आहे आणि निर्माण झालेला महसूल सुद्धा त्यास मिळेल.

**(ऊ) सुरक्षितता आणि प्रतिसाद**

१ ***इंटलिजंट ऑपरेशन्स सेंटर्स (आयओसी- तज्ञ कार्यान्वयण केंद्र) :*** एसपीव्ही आयओसी ची स्थापना आणि व्यवस्था कार्यान्वयण आणि देखभाल करेल. पोलीस वाहने, ऍम्ब्युलन्स आणि इतर साधने एसपीव्ही खरेदी करेल आणि एसएलए मार्फत पोलीस/रूग्णालयांना देतील. साधनांच्या आणि वाहनांच्या कार्यान्वयणासाठी आणि देखभालीसाठी पोलीस/रूग्णालये जबाबदार असतील. पुणे मनपा एसपीव्ही ला जादाची पोलीस कुमक देईल, आवश्यकता असल्यास एसपीव्ही क्षेत्रामध्ये खाजगी सुरक्षा दल स्थापित करण्याचा आणि व्यवस्थापन करण्याचा पर्याय एसपीव्ही कडे असेल.

२ **ई-गव्हर्नन्स आणि वाय-फाय**

- **मध्यवर्ती नियंत्रण केंद्र** *:* मध्यवर्ती नियंत्रण केंद्राची (सेन्ट्रल कमांड सेंटर), संबंधित सेन्सर्स, संवाद जाळे (नेटवर्क) आणि व्यासपीठे यांची स्थापना करणे आणि कार्यान्वयण आणि देखभाल यांसाठी एस पीव्ही जबाबदार असेल.
- ***नागरिक सुविधा केंद्र :*** एसपीव्ही ही नागरिक *सुविधा केंद्र* स्थापित करेल आणि चालवेल यासाठी एस एल ए मार्फत पुणे मनपा योग्य ते सहकार्य करेल.

- *सार्वजनिक इंटरनेट :* एसपीव्ही ऑप्टिकल फायबर नेटवर्क ची स्थापना करेल आणि कार्यान्वयन आणि देखभालीसाठी जबाबदार राहील.
- एसपीव्ही क्षेत्रामधील ई-गव्हर्नन्स सेवांची एक परिपूर्ण यंत्रणा एसपीव्ही नागरिकांना प्रदान करेल आणि कार्यान्वयण आणि देखभालीसाठी जबाबदार असेल.

*३.झोपडपट्टी विकास :*

- एसपीव्ही क्षेत्रामधील झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी एसपीव्हीची असेल. आणि एकूण प्रशासकीय जबाबदारी एस आर ए ची राहील.

४. **परवडणारी घरे :**

- *परवडणारी घरे :* एसपीव्ही क्षेत्रामधील दोन सुविधा जागांवर ईडब्ल्यूएस/एलआयजी लोकसंख्येसाठी परवडणा-या घरांची निर्मिती करेल. एसपीव्ही या जमीनीवर योग्य प्रमाणात परवडणा-या घरांची निर्मिती करेल आणि एसपीव्ही क्षेत्रामधील शहर नियोजन योजने (टाऊन प्लानिंग स्कीम) अंतर्गत विकसित करण्यात येईल.
- *कौशल्य विकास, आरोग्यकाळजी आणि शिक्षण:* एसपीव्ही क्षेत्रामधील सामाजिक-आर्थिक परिवर्तन उपक्रम एसपीव्ही हाती घेईल आणि आरोग्य व्यवस्थापन व शिक्षण सुविधा सुधारण्याच्या दृष्टीने आणि रोजगार निर्मितीसाठी कौशल्य निर्मितीचे काम करेल.

५. **आरोग्य व शिक्षण :**

- *आरोग्य :* करार/पीपीपी इ. मार्फत एसपीव्ही क्षेत्रामधील रूग्णालयांसाठी योग्य सुविधा जागा विकसित करण्यासाठी एसपीव्ही जबाबदार राहील.
- *शिक्षण :* करार/पीपीपी इ. मार्फत एसपीव्ही क्षेत्रामधील शाळांसाठी योग्य सुविधा जागा विकसित करण्यासाठी एसपीव्ही जबाबदार आहे.

६. **ट्रान्झिट आणि स्टार्ट-अप हब :**

- *ट्रान्झिट आणि स्टार्ट-अप हब :* एसपीव्ही ही एसपीव्ही क्षेत्रामधील १२ एकर जमिनीमधील बहु-मजली कार पार्किंगसह ट्रान्झिट आणि स्टार्ट-अप हब विकसित करील. पीएमपीएमएल आणि राज्य शासनाचा उपक्रम एमएसआरटीसी या ट्रान्झिट हबचा उपयोग बस आणि बीआरटी डेपो म्हणून करेल.

## ४.निधीचे वितरण /वित्त पुरवठा

ही मार्गदर्शकतत्वे निर्दिष्ट करतात की एक केंद्र पुरस्कृत योजना म्हणून या अभियानाचे कार्यान्वयण केले जाईल आणि केंद्र सरकार पाच वर्षांच्या कालावधीमध्ये रू. ४८,००० कोटी आर्थिक मदत देण्याचा प्रस्ताव ठेवते म्हणजे प्रत्येक शहरास प्रति वर्ष सरासरी रू. १०० कोटी. एका मिळत्याजुळत्या आधारावर एका समान रकमेचे योगदान राज्य सरकार आणि पुणे मनपा यांनी एकत्रितपणे दिले पाहिजे. या अभियाना मध्ये केंद्र सरकारने, राज्य शासनाने आणि पुणे मनपा ने एसपीव्ही ला दिलेला निधी बांधलेल्या अनुदानाच्या स्वरूपात असेल आणि एका स्वतंत्र अनुदान निधी मध्ये ठेवला जाईल आणि ज्या उद्देशांसाठी हा निधी दिला गेला आहे केवळ त्यासाठी याचा उपयोग केला जाईल आणि घालून दिलेल्या अटींनुसार. विशेषत: स्मार्ट सिटी प्रकल्पांसाठी निश्चित करण्यात आलेले केंद्र आणि राज्य शासन आणि पुणे मनपा यांच्याकडून आलेल्या अनुदानाचा वापर एसपीव्ही कडून भांडवली खर्चांसाठी केला जाईल.

अंतर्गत आणि बाह्य स्त्रोतांमधून निधी आकर्षित करण्यासाठीचे एक प्रेरक म्हणून हे निधी काम करेल पण हे फक्त प्रकल्प खर्चाचा केवळ एक भागच व्यापेल. उर्वरित निधी विविध स्त्रोतांमधून उभे करणे अपेक्षित आहे ज्यात समावेश आहे द्विपक्षीय आणि बहुपक्षीय संस्था (देशांतर्गत आणि परदेशी दोन्ही), स्वच्छ भारत अभियान आणि पुनरूज्जीवन आणि शहरी परिवर्तन यासाठीचे अटल मिशन (अमृत) यांसारख्या अन्य केंद्र सरकारी योजनांशी तसेच खाजगी क्षेत्रांशी एककेंद्राभिमुखता (Convergence) असावी. निधी पुरविण्या व्यतिरिक्त, शैक्षणिक, तंत्रज्ञान इ. क्षेत्रामधील इतर संस्थांशी एसपीव्ही ने आवश्यक ते संबध स्थापित केले पाहिजे.

नाविन्यपूर्ण पद्धती आणून आणि क्षमतांमध्ये सुधारणा करून पुणे मनपा चा महसूल वाढविण्याचा आणि/किंवा कामकाजांचा खर्च कमी करण्याचा हेतू एसपीव्ही चा आहे. वाढीव फायदे / एस पी  व्हि ने केलेल्या कामामुळे म न पा च्या अंदाजपत्रकातील  बचतीचे रक्कम एस पी  व्हि ला कार्यान्वयण आणि देखभाल दुरीस्ती यासाठीचे अंतर भरून काढण्यासाठी देणे आवश्यक राहील. उदा, जर एसपीव्ही ने ९० कोटी किमतीचा प्रकल्प हाती घेतला आणि पालिकेच्या खर्चांची ५० कोटींची बचत केली आणि तसेच महसूल ६० कोटीने वाढविला (वार्षिक सामान्य वाढी व्यतिरिक्त इतर) ज्यामुळे पालिकेचा एकूण वाढीव फायदा रू. ११० कोटींचा झाला. तर एसपीव्ही केवळ ९० कोटीचे अनुदान दिले जाईल आणि पालिका २० कोटी ठेवून घेईल. तथापि, एसपीव्ही द्वारे प्रकल्पावर खर्च केलेल्या ६० कोटींमुळे  पहिल्या वर्षी झालेला निव्वळ फायदा केवळ ३० कोटी असेल, आणि प्रकल्पाच्या जीवनमानाच्या अवधीमध्ये उर्वरित फायद्याची भर पडेल. तर एसपीव्हीला पहिल्या वर्षी ३० कोटी भरपाईन दिली जाईल असे महसूल मिळण्यासाठी एक एसक्रो (भरवशाचे) खाते उघडले पाहिजे ज्याचा उपयोग एसपीव्ही च्या कार्यान्वयण आणि देखभाल खर्चांसाठी निधी पुरविण्यासाठी केला जाईल. ही स्थिती निर्माण होऊ शकते कारण एसपीव्ही, वाहतूक व्यवस्थापन, बस सेव सुधारणा इ. सारख्या महसूल-न मिळणा-या काही प्रकल्पांची सुद्धा अंमलबजावणी करेल.

जर संबंधित अधिनियमांमध्ये तरतूद असलीतर कंपनीच्या उद्देशासाठी ठेवी स्वीकारणे, बाँडस जारी करणे आणि बाह्य स्त्रोतांकडून कर्ज काढणे यांसारखे कर्ज उभारणी करण्याचे अधिकार या एसपीव्ही ला असतील. परिणाम शुल्काची आकारणी करणे आणि पीआयएफ आधारित बाँडस जारी करण्याचा हक्क एसपीव्ही ला असेल आणि तसेच विकासासाठी निवडण्यात आलेल्या स्थानिक-विकास क्षेत्रातील जमिनीतून कमाई (लॅन्ड मॉनिटायझेन) करणे आणि बांधकामाच्या मंजूरीचे हक्क यांच्याकडे असतील.

हे लक्षात घेतले पाहिजे की जर या आभिनयाशी संबंधित कोणत्याही प्रकल्पासाठी पुणे मनपा ला निधी वितरीत केले गेले असतील, तर हे निधी आपोआप आणि त्वरीत एसपीव्ही ला वितरीत केले पाहिजेत. तसेच इक्विटी योगदाना व्यतिरिक्त, राज्य शासन  या अभियानासाठी एक अनुदान म्हणून सुद्धा त्याचे योगदान देऊ शकते. या अभियानासाठी निधी उपलब्ध करून देण्याची त्याची जबाबदारी पूर्ण करण्यासाठी आणि एसपीव्ही च्या आर्थिक शाश्वतीची आणि व्यवहार्यतेची खात्री देण्यासाठी राज्य शासनाकडून हे केले जाईल. राज्य शासनाकडून दिले जाणारे असे अनुदान जेव्हा केव्हा दिले जाईल, तेव्हा ते थेट एसपीव्ही ला निश्चित/स्पष्ट केलेल्या सेवा/विभागांसाठी दिले जाईल.

एसपीव्ही च्या निधीशी संबंधित खालील मुद्दे सुद्धा लक्षात घेतले गेले पाहिजेत:

*लाभांश (डिव्हिडेंड्स)*

एसपीव्ही मध्ये कोणतेही खाजगी शेअरहोल्डर्स असणारी नाहीत अशा वेळेपर्यंत लाभांश पुन्हा एसपीव्ही मध्ये घातले जातील. एकदा का एसपीव्ही मध्ये खाजगी शेअरहोल्डर्स आले, की एसपीव्ही च्या मंडळाच्या निर्णयानुसार वेळोवेळी लाभांश खाजगी शेअरहोल्डर्स मध्ये वितरीत केला जाईल.

*अकाऊंटस आणि लेखापरिक्षण*

कंपनी अधिनियमामध्ये ठराविक कालावधीमध्ये लेखापरिक्षण करणे व कंपनीच्या रजिस्ट्रारना अकाऊंटस सादर करण्याची सक्ती आहे आणि एसपीव्ही ने कंपनी अधिनियमा अंतर्गत विहित सर्व आवश्यकतांचे पालन केले पाहिजे.

**५.एसपीव्ही चे व्यवस्थापन/गव्हर्नन्स**

*प्रशासकीय मंडळ*

ही मार्गदर्शक तत्वे असे सूचित करतात की, संचालक मंडळामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) आणि कार्यकारी संचालकां शिवाय केंद्र सरकार, राज्य शासन, पुणे म न पा आणि स्वतंत्र संचालक यांचे प्रतिनिधी असतील. कंपनी अधिनियमामध्ये तरतूदी असतील, तर या एसपीव्ही मध्ये एक प्रशासकीय मंडळ असेल ज्यात समावेश असेल:

- पुणे मनपा चे आयुक्त जे या एसपीव्ही चे अध्यक्ष सुद्धा असतील.
- महापौर, स्थायी समिती अध्यक्ष आणि विरोधी पक्ष नेते हे तिघे आणि तीन इतर पक्षांचे नेते ( या तिघा पक्षा व्यतिरिक्त पुणे मनपा मध्ये १० पेक्षा जास्त नगरसेवक असलेल्या इतर तीन पक्षांचे) हे एसपीव्ही मध्ये पुणे मनपा चे प्रतिनिधित्व करतील.

- जिल्हाधिकारी पुणे, पोलीस आयुक्त पुणे शहर , पीएमपीएमएल चे सीएमडी आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी , पुणे चे मुख्य अभियंता हे राज्य सरकारचे प्रतिनिधित्व करतील आणि दोन इतर सदरचे जे स्वतंत्र संचालक असतील ज्यांची निवड कार्पोरेट व्यवहार मंत्रालयाद्वारे ठेवण्यात आलेल्या डेटा बँक मधून केली जाईल आणि पुण्याच्या प्रतिष्ठित नागरिकांना ज्यांनी वेगवेगळया कंपन्यांच्या मंडळामध्ये भारतीय सेक्युरिटी ऍण्ड एक्सेंज मंडळाच्या (रोखे आणि विनिमय) सूचिबद्ध केलेल्या करारनाम्यातील कलम ४९ ची पूर्तता करून आदर्शपणे काम केले असेल अशांना किंवा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या व्यावसायिकांना प्राधान्य दिले जाईल.

- शहरी विकास मंत्रालय केंद्र सरकार या मंडळावर केंद्र सरकारच्या एका प्रतिनिधीची नेमणूक करतील.

- एसपीव्ही चे सीईओ

एसपीव्ही मध्ये खाजगी शेअरहोल्डिंग (भागभांडवल) च्या परिस्थितीमध्ये  या मंडळाचा विस्तार करण्याची मुभा राहील. संचालक मंडळावरील संचालकांची जास्तीतजास्त  संख्या पंधरा एवढी मर्यादित असेल.

प्रशासकीय मंडळाची बैठक प्रत्येक तीन महिन्यामध्ये एक वेळा बोलावले जाईल आणि ते मुख्य धोरणात्मक निर्णयांसाठी आणि एसपीव्ही च्या वार्षिक धोरणात्मक योजनांना मान्यता देणे यांसाठी जबाबदार असतील.

सुरळीत प्रशासनाच्या खात्रीसाठी आणि एसपीव्ही मधील हितसक्तीचा संघर्ष टाळण्यासाठी, या अभियानाअंतर्गत एसपीव्ही द्वारे प्रदान करण्यात आलेल्या प्रकल्पांचे निविदेमध्ये सहभागी होण्यास एसपीव्ही च्या संचालक मंडळास आणि त्यांच्या संस्थाना/कंपन्यांना आपोआप नाकारले जाईल.

***कार्यकारी समिती***

एसपीव्ही मध्ये एक कार्यकारी समिती असेल जी एसपीव्ही च्या कामकाजावरील निर्णयासाठी व जे निर्णय एसपीव्ही च्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यक्षेत्रा बाहेरील असतील त्यावर निर्णय घेण्यासाठी महिन्यातून एक वेळा भेटेल.

या कार्यकारी समिती मध्ये समावेश असेल:

(अ) पुणे मनपा चे  आयुक्त

(ब) या एसपीव्ही चे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ)

(क ) या एसपीव्ही चे मुख्य आर्थिक अधिकारी (सीएफओ)

***मुख्य कार्यकारी अधिकारी***

मार्गदर्शक तत्वांनुसार, एक पूर्ण वेळ मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) हे एसपीव्ही चे मुख्यस्थ असतील. एसपीव्ही च्या सीईओ ची नेमणूक मंडळाद्वारे शहरी विकास मंत्रालयच्या परवानगीने ३ वर्षांच्या एका निश्चित कालावधिसाठी केली जाईल व जास्तीत जास्त मुदत वाढ देय राहील.

एसपीव्ही च्या सीईओ साठी योग्य उमेदवारांची शिफारस हे मंडळ केंद्र सरकारच्या शहरी विकास मंत्रालयाच्या  संमतीसाठी करू शकेल. यामुळे सीईओ च्या निवडीचा विशेष हक्क मंडळाकडे राहील आणि केंद्र सरकारकडे नाही.

हे मंडळ खुल्या बाजारातून सीईओ ची नेमणूक करू शकते. सीईओ साठींचा मोबदला बाजारातील मानकानुसार असेल. हे लक्षात घेतले पाहिजे की सीईओ ची शैक्षणिक अर्हता या मार्गदर्शकतत्वांमध्ये निश्चित केलेली नाही आणि सरकारी अधिकारी, वरीष्ठ स्तरावरील कार्पोरेट अधिकारी आणि स्वतंत्र तज्ज्ञ यांचा विचार सीईओ च्या पदासाठी केला जाऊ शकतो.

मार्गदर्शक तत्वांमध्ये विशेषत: निर्दिष्ट करण्यात आलेल्या इतर जबाबदा-यांमधील रोजच्या कामकाजाचा सह एसपीव्ही च्या देखरेखीसाठी आणि व्यवस्थापनासाठी हे सीईओ जबाबदार असतील.

***एसपीव्ही मधील इतर अधिकारी /कर्मचारी***

सीईओ आणि संचालक मंडळां व्यतिरिक्त, एसपीव्ही खालील मुख्य *अधिकारीची* (आवश्यक व्यावसायिक अनुभव असलेल्या) नेमणूक, या अभियान अंतर्गत पुणे शहरामध्ये अंमलबजावणी करण्यात येणारे विविध प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी करतील सदरची यादी ही लाक्षणिक असून त्यातील पद/पदनामामध्ये एसपीव्हीच्या अंतिम रचनेनुसार बदल करण्यात येतील

- मुख्यस्थ (हेड) (वाहतूक आणि रहदारी) – वाहतूक आणि रहदारी मधील सर्व पॅन-सिटी आणि एसपीव्ही क्षेत्रातील प्रकल्प देणे, कार्यान्वित करणे आणि चालविणे/बांधणी करण्यासाठी.

- मुख्यस्थ (हेड) (पाणी पुरवठा आणि स्वच्छता) – पाणी पुरवठा आणि स्वच्छता यांमधील सर्व पॅन-सिटी आणि एसपीव्ही क्षेत्रातील प्रकल्प देणे, कार्यान्वित करणे आणि चालविणे/बांधणी करणे.

- मुख्यस्थ (हेड)(क्रिया कलाप आणि सेवा )/(ओप्रेशन अंड सर्व्हीस) :- एस पी व्हि च्या सर्व सेवांची काळजी घेण्यासाठी.

- मुख्य माहिती अधिकारी – माहिती व दळणवळण तंत्रज्ञान (आय सी टी) आधारित योजना चालविणे आणि पॅन सिटी आणि एसपीव्ही क्षेत्र विकास प्रकल्पांचा एक भाग म्हणून स्मार्ट उपाय कार्यान्वित करणे.

- मुख्य आर्थिक अधिकारी – एसपीव्ही मधील आर्थिक कामकाज चालविणे

- मुख्य दक्षता अधिकारी – एसपीव्ही मधील चांगले प्रशासन आणि एकात्मतेची खात्री देणे

- मुख्य शहरी नियोजक – एसपीव्ही क्षेत्रामधील क्षेत्र विकास प्रकल्पाची योजना आखणे, रचना करणे आणि अंमलबजावणी करणे

एसपीव्ही विविध पार्श्वभूमी (धर्तीवर) असलेल्या समर्पित अधिका-यांची/ *कर्मचार्याची* नेमणूक करू शकते, जे स्मार्ट सिटी प्रकल्पाची दिलेल्या वेळेत आणि प्रभावी पद्धतीने अमंलबजावणी करण्यासाठी आणि व्यवस्थापन करण्यासाठी मुख्यस्थ यांना सहकार्य करतील. तसेच विविध प्रकल्पाचे डिझाईन विकसित करण्यासाठी, व्यवस्थापन आणि अंमलबजावणीसाठी प्रकल्प व्यवस्थापक सल्लागाराची नेमणूक सुद्धा एसपीव्ही कडून केली जाईल.

शेवटच्या स्थितीला, एसपीव्ही कडे ४०-५० कर्मचारी असतील. कर्मचा-यांच्या या संख्येसह एसपीव्ही ची तात्कालिक संस्था रचना खालील प्रमाणे आहे:

- वाहतूक आणि गतिशीलता – १०-१२ कर्मचारी
- पाणी आणि सांडपाणी व्यवस्थापन – ४-५ कर्मचारी
- घनकचरा व्यवस्थापन, स्वच्छता आणि सफाई – ३-४ कर्मचारी
- वातावरण, ऊर्जा आणि शाश्वती – ३-४ कर्मचारी
- नागरिक सेवा आणि आपत्कालिन प्रतिसाद– १०-११ कर्मचारी
- इमारती, पायाभूत सुविधा आणि विकास – ८-९ कर्मचारी
- वित्त – (२-३ कर्मचारी)
- दक्षता – (१-२ कर्मचारी)

ही संख्या लाक्षणिक आहे. आवश्यकते नुसार संख्येत वाढ किंवा घट करण्याचे अधिकार मंडळास राहतील

**६.अधिकारांचे पुनर्प्रदान**

एका एसपीव्ही ची निर्मिती करण्याच्या कारणांपैकी एक प्राथमिक/मुख्य कारण म्हणजे कार्यान्वयण स्वातंत्र्याची आणि निर्णय घेण्यातील स्वायत्ततेची खात्री देणे आणि एसपीव्ही साठीच्या राज्य शासन आणि पुणे मनपा च्या खालील अधिकारांच्या पुनर्प्रदानासाठी मार्गदर्शकतत्वे निश्चित करणे:

- एसपीव्ही च्या आभियानाशी संबंधित असलेले पुणे मनपा चे हक्क आणि जबाबदा-या
- विविध अधिनियम/नियमांअंतर्गत पुणे मनपा ला असलेले निर्णय घेण्याचे अधिकार एसपीव्ही च्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सी ई ओ ) यांना प्रदान करणे.
- या अभियानाअंतर्गत असलेल्या प्रकल्प अंमलबजावणीशी संबंधित राज्य सरकारच्या शहरी विकास विभागास निर्णय घेण्याचे उपलब्ध असलेले अधिकार एसपीव्ही च्या संचालक मंडळास देणे.

एसपीव्ही साठीच्या अधिकारांचे पुनर्प्रदान (डेलिगेशन) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ आणि इतर लागू नियमां अंतर्गत असलेल्या तरतूदीनुसार केले जाऊ शकते. याचा उल्लेख करणे सुद्धा संयुक्तीक असेल की कोणत्याही विभागासाठीचे दर निश्चित करण्याशी संबंधित अधिकार नेहमी प्रमाणे पुणे मनपा कडे राहतील.

***घटनात्मक तरतूदी***

अगदी खालच्या पातळीला लोकशाहीवादी संस्था स्थापन करण्याच्या दृष्टीने, भारतीय घटनेमधील ७३ वी आणि ७४ वी घटना दुरूस्ती विचारात घेऊन, भाग नऊ (IX) चा समावेश पंचायत संस्थेद्वारा केला गेला आहे आणि पालिकांच्या /शहरी स्थानिक संस्थांच्या स्थापनेसाठी आणि त्यांना घटनात्मक दर्जा देण्यासाठी भाग नऊ (ए) (IX ए) प्रदान करण्यात आले आहे. भाग नऊ (ए) (IX-ए) (कलम २४३ पी-२४३झेडजी) पालिकांचे अधिकार आणि जबाबदा-यांच्या विधानमंडळाकडून विकेंद्रीकरण्यासाठी विशेषत: प्रदान करण्यात आले आहे, कारण स्वयंसरकारच्या संस्था म्हणून कार्य करण्यास त्यांना याची आवश्यकता लागू शकते.

### *महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतूदी*

हे एसपीव्ही साठीच्या अधिकारांचे पुनर्प्रदान महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम **६६ (४१-अ)** आणि ६६ अ अंतर्गत करण्याचा प्रस्ताव आहे, हा संस्थांद्वारे करण्यात येणा-या कार्यांशी संबंधित आहे, जो निर्देशित करतो की

**कलम ६६ (४१-अ) नुसार :-** राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने व राज्य शासन ज्या अटी व शर्ती लादिल त्यास आधीन राहून कत्तल खाना चालवण्यासाठी अथवा उभारण्यासाठी किंवा या अधिनियमान्वये किंवा त्यावेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये महानगरपालिकेवर लादलेली कोणतीही कर्तव्य पार पडण्यासाठी महानगरपालिकेला उपयुक्त ठरतील अशा इतर कोणत्याही सेवांची शहरात तरतूद करण्यासाठी स्थापन केलेल्या किंवा स्थापन करावयाच्या; मर्यादित दायित्व असलेल्या कोणत्याही कंपनीच्या किंवा सहकारी संस्थेच्या भाग भांडवलास अंशदान देणे.

**कलम ६६ अ नुसार :-** *'जेव्हा या अधिनियमा अंतर्गत किंवा अंमलात असलेल्या कोणत्याही इतर नियमाच्या अंतर्गत, एखाद्या पालिकेला कोणतेही कर्तव्य पार पाडण्यास दिले, किंवा कोणतेही कार्य दिले गेले, किंवा एखाद्या पालिकेला राज्य सरकार कडून किंवा कोणत्याही इतर अधिका-यांकडून एखाद्या योजनेची अंमलबजावणी करणे सोपविण्यात आल्यास तेव्हा -*

- *पालिका स्वत: अशा कर्तव्याचे पालन करेल किंवा असे कार्य करेल किंवा अशा योजनेची अंमलबजावणी करेल; किंवा*
- *राज्य सरकारने जारी केलेल्या अशा निर्देशाच्या आणि निश्चित केलेल्या नियम आणि नियमावलीच्या संदर्भाने कोणत्याही संस्थेने याचे पालन करावयाचे असल्यास, काम करावयाचे असल्या किंवा अंमलबजावणी करायची असल्यास:*

*पालिका, अशा संस्थेच्या व्यवस्थेसाठी राज्य सरकारने निश्चित केलेल्या नियम आणि अटींशी सुसंगत नसलेल्या नियम आणि अटी सुद्धा निर्देशित करू शकते, असे झाल्याच्या संदर्भात.'*

वरील दृष्टीने, अशा संस्थांची तरतूद करण्यासाठी राज्य सरकारने निश्चित केलेल्या नियम आणि अटींमध्ये विसंगत नसलेल्या साठी महानगरपालिका नियम आणि अटी स्पष्ट करू शकते.'

## ७.अनेक विविध

### *भाडेतत्वावर देणे आणि गहाण टाकण्याचे हक्क*

एसपीव्ही च्या मालकीची किंवा त्यांनी निर्मिती केलेली मालमत्ता भाडेतत्वावर देणे आणि गहाण टाकण्याचे हक्क उपलब्ध असतील.

### *कंपनी गुंडाळणे/बंद करणे*

एसपीव्ही गुंडाळणे/बंद करण्याची कार्यपद्धत कंपनी अधिनियमांमधील तरतूदीं नुसार असेल. एस पी व्हि बंद झाले नंतर एस पी व्हि ने निर्मित केलेल्या मालमत्ता ह्या पुणे म न पा कडे निहित होतील.